मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेचे कामकाज पेपरलेस

## ३५ विभागांचा कारभार ऑनलाइन

**। पिंपरी-चिंचवड।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

हापालिकेचा कारभार आता कागदविरहित (पेपरलेस) होणार असून, प्रशासनाने त्या दिशेने पाऊल टाकले आहे. 'जीएसआय सक्षम ईआरपी' प्रणालीचे अनावरण आयुक्त शेखर सिंह यांनी केले. या कार्यप्रणालीनुसार पालिकेच्या विविध ३५ विभागांचे कामकाज ऑनलाइन चालणार आहे. सर्व विभाग ऑनलाइन जोडण्यात येत आहेत. त्यामुळे अधिकारी, कर्मचाऱ्यांचे श्रम वाचून कामकाजात पारदर्शकता येणार आहे. महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयातील विवाहनोंदणी प्रमाणपत्र, सर्व नाट्यगृहांचे बुकिंग, ग्रंथालये, पशुवैद्यकीय विभागाकडील श्वान परवाने, माहिती अधिकार अर्ज (आरटीआय) आदी विभागांचे कागदविरहित ऑनलाइन कामकाज करण्यात येत आहे. आतापर्यंत नऊ विभागांचे कामकाज ऑनलाइन केले आहे. यापुढे उर्वरित विभागांचे कामकाजदेखील ऑनलाइन करण्यात येणार आहे.जीएसआय सक्षम ईआरपी' प्रणालीद्वारे नागरी सुविधा, सुरक्षा, ग्रंथालय, क्षेत्रीय कार्यालये, वैद्यकीय विभाग, भांडार विभाग



यासह अन्य विभागांचे कामकाज ऑनलाइन होत आहे. अधिकारी, कर्मचाऱ्यांना विभागातील सर्व माहिती ऑनलाइन उपलब्ध होणार आहे. कामकाज संपूर्णपणे कागदविरहित होणार असल्याने अधिक सुलभता येणार आहे. सर्व कार्यालये ऑनलाइन झाल्यास कामकाजाच्या नस्ती, कागदपत्रे ऑनलाइन पाहता येतील. त्यामुळे कागदविरहित सर्व नस्तीला देखील मान्यता देता येणार आहे. शहरातील नागरिकांना आता घरी बसून ऑनलाइन विवाह नोंदणी प्रमाणपत्र काढता येणार आहे. कागदपत्रे 'अपलोड' केल्यानंतर क्षेत्रीय कार्यालयाकडून वेळ राखीव ठेवण्यात येणार आहे. संदेश, ई-मेलद्वारे राखीव तारीख व वेळेची सूचना, छायाचित्र आणि बोटांचे ठसे घेण्याची सुविधा दिली जाणार आहे. कागदपत्रांची पडताळणी ऑनलाइन केली जाईल. विवाहनोंदणी प्रमाणपत्र, प्रमाणपत्रातील दुरुस्ती, विवाह संस्थांची नोंदणी करता येणार आहे. पाळीव प्राण्यांसाठी लसीकरणाची नोंद, श्वान-मांजराचा परवाना, परवाना नूतनीकरण, मृत पाळीव प्राण्यांच्या दहनासाठी परवानगी, पाळीव प्राणी दत्तक घेण्याची प्रक्रिया सहज करण्यात येणार आहे.आयुक्त शेखर सिंह म्हणाले, की महापालिकेच्या सर्व विभागांच्या अंतर्गत प्रशासन कार्यक्षमतेत सुधारणा करणे, नागरिकांसाठी ऑनलाइन सेवा सुलभ होण्याच्या दृष्टीने 'जीआयएस सक्षम ईआरपी' प्रणाली सुरू केली आहे. पारदर्शक प्रशासन व नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी ही प्रणाली कार्यरत करण्यात येत आहे. अधिकारी, कर्मचाऱ्यांना निर्णय घेणे सोपे होणार आहे. कामकाजाला गती मिळणार आहे.

# श्रीमन् महासाधू श्रीमोरया गोसावी महाराज संजीवन समाधी मंदिर येथे अन्नसात्राचे उद्घाटन

**। पिंपरी-चिंचवड।**

फाल्गुन शुद्ध चतुर्थी अर्थात विनायकी चतुर्थीच्या शुभ मुहूर्तावर (दि.१३) रोजी चिंचवड देवस्थान ट्रस्टच्या माध्यमातून आणि डॉ. प्रमोदजी चौधरी यांच्या सहकार्याने श्रीमन् महासाधू श्रीमोरया गोसावी महाराज संजीवन समाधी मंदिरात मोरया भक्तांना प्रसाद वाटप करण्यासाठी नव्याने उभारण्यात आलेल्या श्री मोरया सभामंडप या वास्तूचे डॉ. प्रमोदजी चौधरी यांच्या शुभ हस्ते उद्घाटन करण्यात आले. या मंगल प्रसंगी चिंचवड देवस्थान ट्रस्टच्या लोकाभिमुख उपक्रमाला शुभेच्छा देण्यासाठी मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे यांची प्रमुख उपस्थिती होती.खासदार श्रीरंग बारणे यांनी यावेळी चिंचवड देवस्थान ट्रस्टच्या एकुणच कामाचे कौतुक केले आणि अशा प्रकारच्या लोकाभिमुख उपक्रमाची सुरवात केली यासाठी समाधान व्यक्त करतानाच या उपक्रमात आवश्यक त्या ठिकाणी चिंचवड देवस्थान ट्रस्टला योग्य सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

डॉ. प्रमोदजी चौधरी म्हणाले की, आपण अनेक वर्षे श्री मोरया महाराजांच्या दर्शनाला येत आहोत, श्री मोरया वर आपली नितांत श्रद्धा आहे, त्यामुळे चिंचवड देवस्थान ट्रस्टच्या विश्वस्तांनी या उपक्रमासाठी सहकार्य करण्या संदर्भातील प्रस्ताव मांडला तेव्हा आपल्या हातून श्री मोरयाची काही तरी सेवा घडणार आहे आणि चिंचवड देवस्थान ट्रस्टच्या प्रसाद वाटपाच्या या पुण्यकर्मात आपला देखील खारीचा वाटा असावा या विचाराने देवस्थान ट्रस्टच्या या प्रस्तावाला मी तात्काळ होकार दिला. आणि आज या मोरया सभामंडपाचे उद्घाटन झाले याचा मनस्वी आनंद झाला, अशा प्रकारची भावना व्यक्त केली. चिंचवड देवस्थान ट्रस्टचे मुख्य विश्वस्त मंदार महाराज देव यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत आणि सत्कार केला. चिंचवड देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त क्रमांक २ जितेंद्र देव यांनी आपल्या प्रास्ताविकात या सदर उपक्रमासंदर्भात देवस्थानची भूमिका आणि माहिती दिली. चिंचवड देवस्थान ट्रस्ट चे विश्वस्त अॅड. राजेंद्र उमाप यांनी सर्व मान्यवरांचे आणि उपस्थित मोरया भक्तांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नारायण लांडगे यांनी केले.

या प्रसंगी मोरया सभामंडपाचे काम अतिशय कमी वेळात आणि अत्यंत चांगल्या प्रकारे पुर्ण केल्या बद्दल प्राज इंडस्ट्रीजचे आर्किटेक्ट, इंजिनिअर, तंत्रज्ञ यांचा देखील सत्कार देवस्थानच्या वतीने करण्यात आला. चिंचवड देवस्थान ट्रस्टचे कारभारी किशोर जोशी, श्री. मेढेकर, मंदिराच्या व्यवस्थापिका सौ. कुलकर्णी मॅडम, देवस्थान ट्रस्टचे सर्व कार्यालयीन व सुरक्षा कर्मचारी यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले होते. उद्घाटन झाल्यावर डॉ. प्रमोद चौधरी, चिंचवड देवस्थान ट्रस्टचे मुख्य विश्वस्त मंदार महाराज देव, विश्वस्त जितेंद्र देव, केशव विद्वांस, अॅड. राजेंद्र उमाप, माजी नगरसेवक राजेंद्र गावडे, अॅड मोरेश्वर शेडगे, यांच्या हस्ते श्री मोरया भक्तांना प्रसाद वाटप करण्यात आले. अशा प्रकारे श्रीमन् महासाधू श्रीमोरया गोसावी महाराज संजीवन समाधी मंदिरात अन्नदान प्रसाद वाटप सुरू करावे ही मोरया भक्तांची अनेक दिवसांपासून असलेली इच्छा पूर्ण होत असल्याने भाविकांनी समाधान व्यक्त केले. सदर कार्यक्रमासाठी मोरया गोसावी देव मंडळाचे अध्यक्ष अॅड नरेंद्र देव, राष्ट्रवादी काँग्रेस पिंपरी चिंचवड जिल्हा उपाध्यक्ष निरंजन देव, ऋषिकेश देव, संजीव देव, प्रदीप देव, स्वप्नील देव, अजय देव व मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. इथून पुढे दर रविवारी आणि दर मंगळवारी संध्याकाळी श्रीमन् महासाधू श्रीमोरया गोसावी महाराजांची आरती होउन अन्य प्रसाद व दर संकष्टी चतुर्थीला नियमित खिचडी वाटप याच श्री मोरया सभामंडपात होईल मोरया भक्तांनी त्याचा लाभ घ्यावा हे आवाहन चिंचवड देवस्थान ट्रस्टचे मुख्य विश्वस्त मंदार महाराज देव यांनी केले.

# निवडणुकीपूर्वी 'सीईटीपी' निविदा प्रक्रिया

## संसदरत्न श्रीरंग आप्पा' या 'कॉफी टेबल बुक'चे प्रकाशन सामंत यांच्या हस्ते



**। पिंपरी-चिंचवड ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

मावळ लोकसभा मतदारसंघातून वाहणाऱ्या पवना आणि इंद्रायणी नद्यांचे प्रदूषण रोखण्याच्या उपाययोजना करण्यासाठी खासदार श्रीरंग बारणे हे राज्य व केंद्र सरकारकडे पाठपुरावा करत आहेत. त्यासाठी औद्योगिक रासायनिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (सीईटीपी) उभारण्याचे प्रस्तावित आहे. दोन वेळा बैठक झाली असून, प्रकल्पासाठी दोन हजार कोटी रुपयांचा निधी आवश्यक आहे. प्रकल्पाचा सर्वंकष विकास आराखडा (डीपीआर) तयार करण्याचे काम सुरू आहे. आगामी विधानसभा निवडणुकीपूर्वी त्याचे काम पूर्ण होऊन निविदा प्रक्रिया सुरू होईल, अशी ग्वाही उद्योगमंत्री उदय सामंत यांनी पिंपरी-चिंचवडमध्ये दिली. मावळ लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना खासदार श्रीरंग ऊर्फ आप्पा बारणे यांनी सलग दहा वर्षे संसदेत प्रतिनिधित्व केले आहे. त्यांचा कार्यपूर्ती अहवाल 'संसदरत्न श्रीरंग आप्पा' या 'कॉफी टेबल बुक'चे प्रकाशन उद्योगमंत्री सामंत यांच्या हस्ते गुरुवारी (ता. १४) काळेवाडीतील रागा पॅलेस सभागृहात झाले. त्या वेळी ते बोलत होते. आमदार महेश लांडगे, उद्योजक कृष्णकुमार गोयल, भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर, संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे, श्रीक्षेत्र भंडारा डोंगर समितीचे बाळासाहेब काशीद, 'सकाळ'चे संपादक सम्राट फडणीस आदी उपस्थित होते. सामंत म्हणाले, ''खासदार झाल्यापासून आप्पा बारणे यांनी सातत्याने इंद्रायणी आणि पवना नदी प्रदूषणमुक्त करण्याची भूमिका घेतली आहे. त्यासंदर्भात आम्ही चार महिन्यांपूर्वी महापालिकेत बैठक घेतली. इंद्रायणी नदीशी वारकऱ्यांचा संबंध येतो. पण, तिच्या प्रदूषणामुळे वारकऱ्यांना त्रास होतो. नदीचे पावित्र्य नष्ट होत आहे.म्हणून सरकारने कार्यवाही केली पाहिजे, अशी भूमिका आप्पांनी मांडली. त्यावर चार महिन्यांपूर्वी सरकारने निर्णय घेतला आहे. दोन हजार कोटी रुपये आम्ही त्याबाबतच्या प्रकल्पावर खर्च करतोय. तीन वर्षात एमआयडीसी, महापालिका, पीएमआरडीए यांच्या माध्यमातून औद्योगिक रासायनिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (सीईटीपी) उभारण्यात येणार आहे. त्याचा डीपीआर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. आचारसंहिता संपेपर्यंत डीपीआरचे काम सुरू होईल आणि जून-जुलैपर्यंत त्याचे काम संपेल. विधानसभा निवडणूक जाहीर होण्याअगोदर त्याची निविदा निघेल, अशी ग्वाही मी उद्योगमंत्री म्हणून देतोय.''खासदार श्रीरंग आप्पा बारणे हे अजातशत्रू व्यक्तिमत्त्व आहे. त्यामुळे आप्पा, तुम्ही चिंता करण्याची काही आवश्यकता नाही, माझं मन सांगतंय की, पुढच्या निवडणुकीलादेखील मोठ्या फरकाने तुम्ही निवडून येणार आहात. आप्पांसोबत उपस्थित राहण्याची संधी अनेक कार्यक्रमांतून मला मिळाली. त्यातून जाणवले की, त्यांच्यावर प्रेम करणारा वर्ग फक्त पक्षातीलच नसून विविध क्षेत्रातील आहे. विविध पक्षातील आहेत. आप्पांनी लोकांशी निगडित विकासाची कामे केली आहेत. लोकांची कामे करणाऱ्या लोकप्रतिनिधीला जपणे ही मतदारांची देखील जबाबदारी आहे. लवकरच तुम्ही मला प्रचाराला बोलवाल, अशी मी ग्वाही देतो. माझी भावना सांगतो की, तुमच्यासारखी व्यक्ती पुन्हा खासदार होणे, ही काळाची गरज आहे. मोठ्या मताधिक्याने आपण याल, असा विश्वासही सामंत यांनी व्यक्त केला.

# नदी प्रदूषणावरून पोकळ घोषणा कशाला?

## निवडणुकांच्या तोंडावर सरकार घोषणा करत असल्याची वाघेरे यांची टीका

**। पिंपरी-चिंचवड ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

राज्य सरकारचे मंत्री पिंपरी चिंचवड शहरात येऊन नद्यासाठी आम्ही आगामी तीन वर्षात दोन हजार कोटी खर्च करणार असल्याची घोषणा करत आहे. परंतु, ज्यांच्यासाठी ते या घोषणा करत आहेत. त्यांनी दहा वर्षाच्या आपल्या कारकीर्दीत नदी प्रदूषण रोखण्यासाठी काय केले आणि निव्वळ निवडणुकीच्या तोंडावर नदी प्रदूषणाचा आधार घेत पोकळ घोषणा कशाला, असा थेट सवाल शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) मावळ लोकसभा संघटक संजोग वाघेरे यांनी केला आहे.संजोग वाघेरे पाटील यांनी नदी प्रदूषणावरून सरकार आणि सरकारचे प्रतिनिधी पिंपरी चिंचवडकर नागरिक व मावळमधील शेतकरी वर्गाची दिशाभूल करत असल्याची टीका केली आहे. त्यांनी म्हटले आहे की, मावळ, मुळशीतून येणा-या, तसेच पिंपरी चिंचवड शहरातील तिन्ही प्रदूषणाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. अनेक ठिकाणी थेट नाले नदीत जाऊन मिळतात. एमआयडीसी औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक सांडपाणी नदीत मिसळते. त्यामुळे वारंवार नदी पात्रात फेस निर्माण होत आहे. अनेकवेळा मासांचा मृत्यू होतो. हा प्रदूषणाचा विषय अद्याप गांभीर्याने घेतला जात नाही. देहू – आळंदी ही वारकऱ्यांची आणि संतांची भूमी असलेल्या या नद्यांचे प्रकल्प यापूर्वीच व्हायला पाहिजे होते. एवढा उशीर का लागला, निवडणुकीच्या तोंडावर खोटी आश्वासने देण्याचे काम खासदार आणि राज्य सरकारचे काही मंडळी शहरात येऊन करत आहेत. परंतु यापूर्वी त्यांना नदी प्रदूषणाचे गांभीर्याने दिसले नाही. मागील कित्येक वर्षांपासून हा प्रश्न होता. मागील दहा वर्षात ज्यांना नद्यांचे आरोग्य सुधारण्यासाठी प्रयत्न करण्याची संधी होती. त्यांनी या कालावधीत काय केले, असा प्रश्न वाघेरे यांनी केला आहे. देहूगाव येथे इंद्रायणी नदीच्या काठावर बुधवारी मोठ्या संख्येने मासे मृतावस्थेत आढळले. या नदीत देवमाशांसारखे दुर्मिळ मासे देखील असल्याचे दिसून आले. हा प्रकार गंभीर असून या संदर्भात संजोग वाघेरे पाटील यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडी) आणि पिंपरी चिंचवड महापालिका प्रशासनाला पत्र पाठवले आहे. त्यात नदी प्रदूषणाचा विषय गांभीर्याने घेऊन ते रोखण्याकरिता आवश्यक उपाययोजना तातडीने करण्याची मागणी केली आहे.

# अजित पवारांचे बंधू सुप्रिया सुळेंच्या प्रचारात

## श्रीनिवास पवार यांच्याकडे इंदापूर मतदारसंघाची जबाबदारी

**पुणे ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
राज्याचे उपमुख्यमंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांचे धाकटे बंधू श्रीनिवास पवारही सुप्रिया सुळे यांच्या बाजूने लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात उतरले आहेत. त्यांच्याकडे इंदापूर विधानसभा मतदारसंघाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत पवार कुटुंबीयांतील बहुतांश सदस्य माजी केंद्रीय मंत्री शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांच्या बाजूने असल्याचे स्पष्ट झाले आहे.राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर बारामती लोकसभा मतदारसंघाची निवडणूक शरद पवार आणि अजित पवार यांच्यासाठी प्रतिष्ठेची झाली आहे. सुळे यांच्याविरोधात अजित पवार यांची पत्नी सुनेत्रा या उमेदवार असणार आहेत. त्यामुळे नणंद-भावजय अशी ही लढत होणार असून पवार कुटुंबियांसाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची ठरली आहे. शरद पवार यांच्या सोबत पवार कुटुंबीयातील बहुतांश सदस्य आहेत. काही दिवसांपूर्वी अजित पवार यांचे पुतणे युगेंद्र हे सुप्रिया सुळे यांच्यासाठी प्रचारात उतरले होते. त्यानंतर आता अजित पवार यांचे धाकटे बंधू, उद्योगपती श्रीनिवास हे सुप्रिया सुळे यांच्यासाठी प्रचारात उतरले आहेत.श्रीनिवास पवार आणि त्यांच्या पत्नी शर्मिला पवार या सुप्रिया सुळे यांच्या प्रचारात सक्रिय होणार आहेत. शरद पवार यांच्या उपस्थितीमध्ये पुढील शनिवारी (२३ मार्च) इंदापूर येथे मेळावा होणार आहे. त्यादृष्टीने इंदापूर तालुक्यातील प्रचाराची जबाबदारी श्रीनिवास आणि शर्मिला पवार यांच्याकडे देण्यात आली आहे. शर्मिला पवार यांनी शरयू फाउंडेशनच्या माध्यमातून इंदापूर तालुक्याच्या दुष्काळ भागात जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर केली आहेत. अल्पभूधारक, शेतकऱ्यांना व्यक्तिगत विहीर खोदाई, जमिन सपाटीकरणासाठी त्यांनी मदत केली आहे. सक्रिय राजकारणापासून काहीसे अलिप्त असले तरी, ते लोकसभेच्या निवडणूक प्रचारात सुळे यांच्या बाजूने उतरल्याने अजित पवार यांच्यापुढील अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे.पवार कुटुंबियातील बहुतांश सदस्य शरद पवार यांच्याबरोबर आहेत. बारामती येथील मेळाव्यात काही दिवसांपूर्वी अजित पवार यांनीही ही बाब उघड केली होती. कुटुंबात मला एकटे पाडले जात आहे, असे विधान अजित पवार यांनी केले होते. या पार्श्वभूमीवर आता श्रीनिवास आणि शर्मिला पवार यांनी भेटीगाठीही सुरू केल्या आहेत.राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर बारामती लोकसभा मतदारसंघाची निवडणूक शरद पवार आणि अजित पवार यांच्यासाठी प्रतिष्ठेची झाली आहे. सुळे यांच्याविरोधात अजित पवार यांची पत्नी सुनेत्रा या उमेदवार असणार आहेत. त्यामुळे नणंद-भावजय अशी ही लढत होणार असून पवार कुटुंबियांसाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची ठरली आहे.



**» शरद पवार यांच्या सोबत पवार कुटुंबीयातील बहुतांश सदस्य आहेत. काही दिवसांपूर्वी अजित पवार यांचे पुतणे युगेंद्र हे सुप्रिया सुळे यांच्यासाठी प्रचारात उतरले होते. अजित पवार यांचे धाकटे बंधू, उद्योगपती श्रीनिवास हे सुप्रिया सुळे यांच्यासाठी प्रचारात उतरले आहेत.श्रीनिवास पवार आणि त्यांच्या पत्नी शर्मिला पवार या सुप्रिया सुळे यांच्या प्रचारात सक्रिय होणार आहेत. शरद पवार यांच्या उपस्थितीमध्ये पुढील शनिवारी (२३ मार्च) इंदापूर येथे मेळावा होणार आहे. त्यादृष्टीने इंदापूर तालुक्यातील प्रचाराची जबाबदारी श्रीनिवास आणि शर्मिला पवार यांच्याकडे देण्यात आली आहे. शर्मिला पवार यांनी शरयू फाउंडेशनच्या माध्यमातून इंदापूर तालुक्याच्या दुष्काळ भागात जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर केली आहेत. अल्पभूधारक, शेतकऱ्यांना व्यक्तिगत विहीर खोदाई, जमिन सपाटीकरणासाठी त्यांनी मदत केली आहे. सक्रिय राजकारणापासून काहीसे अलिप्त असले तरी, ते लोकसभेच्या निवडणूक प्रचारात सुळे यांच्या बाजूने उतरल्याने अजित पवार यांच्यापुढील अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे.**

# आमदाराचे पत्र आणा, ससूनचे अधीक्षक बना!

## राष्ट्रवादीच्या शिफारशीनुसार मंत्र्यांकडून नियुक्ती

**पुणे ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
ससून सर्वोपचार रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकपदी डॉ. अजय तावरे यांची गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात नियुक्ती करण्यात आली. आता ही नियुक्ती राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार सुनील टिंगरे यांच्या शिफारशीनुसार वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी केल्याची बाब समोर आली आहे. मूत्रपिंड प्रत्यारोपण रॅकेटमध्ये याच डॉ. तावरे यांना अधीक्षक पदावरून हटवून त्यांची चौकशी करण्यात आली होती. डॉ. तावरे यांची ससूनच्या वैद्यकीय अधीक्षकपदी नियुक्ती करावी, असे शिफारसपत्र आमदार टिंगरे यांनी मुश्रीफांना गेल्या वर्षी २६ डिसेंबरला पाठविले होते. या पत्रात म्हटले होते की, डॉ. अजय तावरे हे माझ्या परिचयाचे आहेत. ते प्राध्यापक व न्यायवैद्यकशास्त्र विभागाचे प्रमुख आहेत. त्यांनी करोना संकटाच्या काळात उत्तम कर्तव्य पार पाडले होते. तरी त्यांची ससूनच्या वैद्यकीय अधीक्षकपदी नियुक्ती करण्याबाबत आपल्या स्तरावर उचित कार्यवाही करावी.यावर मंत्री मुश्रीफ यांनी शेरा मारून ते पत्र ससूनचे अधिष्ठाता डॉ. विनायक काळे यांना पाठविले होते. नियमानुसार वैद्यकीय अधीक्षक हा प्राध्यापक असण्याची आवश्यकता आहे, असे समजते. सध्या ज्यांच्याकडे कार्यभार आहे ते निकष पूर्ण करीत नाहीत. त्यामुळे विनंतीप्रमाणे कार्यभार देण्यात यावा, असा शेरा मुश्रीफांनी मारला होता. त्यानंतर लगेचच डॉ. तावरे यांची तीन दिवसांत २९ डिसेंबर २०२३ रोजी वैद्यकीय अधीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली. मूत्रपिंड प्रत्यारोपण रॅकेटप्रकरणी डॉ. तावरे यांची चौकशी अद्याप पूर्ण झालेली नाही. त्यावेळी त्यांना अधीक्षकपदावरून हटविण्यात आले होते. आमदारांच्या शिफारसपत्रामुळे मात्र पुन्हा त्यांचीच नियुक्ती करण्यात आली. विशेष म्हणजे, ससून सर्वोपचार रुग्णालयात मागील काही काळापासून वैद्यकीय अधीक्षकपदाची 'संगीत खुर्ची' सुरू आहे.



# लष्करातील जवानाचा कारनामा!

## प्रेयसीच्या पतीची हत्या केल्याप्रकरणी अटक





**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** लष्करातील जवानाच्या प्रेमात पडली आणि प्रियकराच्या मदतीनं पतीचा काटा काढला. पतीची हत्या अपघाताने झाल्याचा बनाव रचत, एक कोटींचा विमा हडपायचा कट ही रचण्यात आला. मात्र पिंपरी चिंचवड पोलिसांच्या गुंडा विरोधी पथकानं त्यांचं बिंग फोडलं. पतीच्या हत्येप्रकरणी पत्नी आणि लष्करातील प्रियकर जवानासह साथीदाराला बेड्या ठोकण्यात आल्यात. यामुळं सैन्य दलात खळबळ उडाली. सुप्रिया गाडेकर असं पत्नीचं, सुरेश पाटोळे असं जवानाचं आणि रोहिदास सोनवणे असं साथीदाराचे नाव आहे. तर राहुल गाडेकर असं मयताचे नाव आहे. राहुल आणि सुप्रियाचे सहा वर्षांपूर्वी विवाह झाला. त्यांना चार वर्षाचा मुलगा ही आहे. संसार सुखात सुरु होता. राहुल वाहन क्षेत्रातील नामांकित कंपनीत सत्तर हजारांच्या नोकरीवर होता. सुप्रिया आधी परिचारिका तर नंतर कोरोनाकाळात तिने लॅब सुरु केली. याच लॅबमध्ये तिची दिल्लीत सैन्य दलात नोकरीला असणाऱ्या सुरेश पाटोळे सोबत झाली. दोघांमध्ये संवाद वाढत गेला आणि दोघांचे विवाहबाह्य प्रेमसंबंध जुळले. सुरेशचे ही चार वर्षांपूर्वी लग्न झालेलं असून त्यांना ही दोन वर्षांची मुलगी आहे. सुप्रिया आणि सुरेश दोघांचे संसार सुरु असताना ही त्यांनी याची कोणतीच फिकीर नव्हती. अशात सुप्रियावर पती राहुलला संशय आला. यावरून दोघांमध्ये खटके उडू लागले. मग एकमेकांच्या प्रेमात वेडे झालेल्या सुप्रिया आणि सुरेशने कट रचला आणि प्रेमात अडसर ठरणाऱ्या राहुलचा काटा काढायचं ठरलं. राहुलचा अडथळा दूर करताना त्याच्या नावे असणारा एक कोटींचा विमा हडपायचा, असा ही डाव त्यांनी आखला.ठरल्याप्रमाणे तीन महिन्यापूर्वी म्हणजे डिसेंबरमध्ये सुरेश दिल्लीवरून सुट्टीसाठी देहूत त्याच्या घरी आला. अहमदनगर जिल्ह्यातील आते-बहिणीच्या गावी जाऊन रोहिदासला याबाबत सांगितलं आणि तुला तुझ्या वाटणीचे पैसे दिले जातील, असं सांगून त्याला ही या कटात सहभागी करून घेतलं. दहा फेब्रुवारीला अहमदनगर जिल्ह्यातील अकोले गावातून पत्नीला भेटून, राहुल कामावर येत होता. याबाबत पत्नी सुप्रियाने पतीची खबर प्रियकर सुरेशला दिली. त्यावेळी पुणे-नाशिक महामार्गावर सुरेश आणि रोहिदासने पाठलाग सुरु केला, पुढं घारगाव जवळ या दोघांनी राहुलच्या गाडीवर हल्ला करत, त्यास जीवे मारण्याचा प्रयत्न केला, पण राहुल यातून बचावला. जखमी अवस्थेत राहुल नगर पोलिसांकडे गुन्हा दाखल केला. या घटनेमुळं घाबरलेल्या राहुलने घरातचं राहणं पसंत केलं. मात्र पत्नी सुप्रियाने किती दिवस घरी बसून राहणार, असं म्हणत कामावर जाण्याचा तगादा लावला. मग राहुलने कंपनीला विनंती करून रात्रपाळी सुरु करून घेतली आणि नऱ्हे आंबेगावमध्ये राहण्याऐवजी आळंदी लगत राहणाऱ्या पत्नीच्या मामाच्या घरी राहायचं ठरवलं. याबाबत पत्नीने प्रियकर सुरेशला याची कल्पना दिली. मग सुरेशने रोहिदासच्या सोबतीने रेकी करायला सुरुवात केली. २३ फेब्रुवारीला पती पत्नीच्या मामाच्या घरातून चाकण एमआयडीसीमधील कंपनीत कामासाठी निघाला. तो घरातून बाहेर पडताच पत्नीने सुरेशला कळवलं आणि त्या दोघांनी राहुलला रस्त्यात गाठलं.गाडी आडवी मारून त्याला खाली पाडलं, मग पाठीवर उभं राहून, हातोडीनं डोक्यावर प्रहार केला.

### सैन्य दलात खळबळ

» लष्करातील जवानाच्या प्रेमात पडली आणि प्रियकराच्या मदतीनं पतीचा काटा काढला. पतीची हत्या अपघाताने झाल्याचा बनाव रचत, एक कोटींचा विमा हडपायचा कट ही रचण्यात आला. मात्र पिंपरी चिंचवड पोलिसांच्या गुंडा विरोधी पथकानं त्यांचं बिंग फोडलं. पतीच्या हत्येप्रकरणी पत्नी आणि लष्करातील प्रियकर जवानासह साथीदाराला बेड्या ठोकण्यात आल्यात. यामुळं सैन्य दलात खळबळ उडाली. सुप्रिया गाडेकर असं पत्नीचं, सुरेश पाटोळे असं जवानाचं आणि रोहिदास सोनवणे असं साथीदाराचे नाव आहे. तर राहुल गाडेकर असं मयताचे नाव आहे.राहुल आणि सुप्रियाचे सहा वर्षांपूर्वी विवाह झाला. त्यांना चार वर्षाचा मुलगा ही आहे. संसार सुखात सुरु होता. राहुल वाहन क्षेत्रातील नामांकित कंपनीत सत्तर हजारांच्या नोकरीवर होता.

# राज्यातील शाळांतील शिक्षकांना आता 'ड्रेसकोड

## ड्रेसकोड लागू करण्याचे शालेय शिक्षण विभागाने दिले निर्देश

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या शाळांतील शिक्षकांसाठी ड्रेसकोड लागू करण्याचे निर्देश शालेय शिक्षण विभागाने दिले. तसेच शिक्षकांच्या नावामागे इंग्रजीत 'टीआर' आणि मराठीत 'टि' संबोधन लावण्याची सूचनाही देण्यात आली आहे.शालेय शिक्षण विभागाने या संदर्भातील शासन निर्णय प्रसिद्ध केला. शिक्षक भावी पिढी घडवत असतात, जनमानसात त्यांच्याकडे गुरू, मार्गदर्शक म्हणून पाहिले जाते. शिक्षकांचा संबंध विद्यार्थी, पालक, प्रतिष्ठित व्यक्ती, लोकप्रतिनिधी यांच्याशी येत असतो. त्यामुळे अध्यापनाचे काम करताना आपला पेहराव शाळेला आणि पदाला अनुरूप ठरेल, याची सर्वतोपरी काळजी घेणे अभिप्रेत आहे. शिक्षकाचा पेहराव अशोभनीय, अव्यवस्थित आणि अस्वच्छ असल्यास त्याचा अप्रत्यक्ष परिणाम त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर, तसेच विद्यार्थ्यांवर होतो असे नमूद करून शिक्षकांच्या पेहरावासंदर्भातील मार्गदर्शक सूचना शालेय शिक्षण विभागाने दिल्या.महिला शिक्षकांनी साडी, चुडीदार-सलवार, कुर्ता, दुपट्टा अशा पद्धतीने, तर पुरुष शिक्षकांनी शर्ट, ट्राउझर पँट, शर्ट इन करून पेहराव करावा. शाळेने शिक्षकांसाठी एकच ड्रेसकोड, परिधान करायच्या पेहरावाचा रंग निश्चित करावा, पेहरावाला शोभतील अशी पादत्राणे असावीत, वैद्यकीय कारण असल्यास पुरुष, महिला शिक्षकांना बूट घालण्यातून सवलत द्यावी, स्काऊट गाईडच्या शिक्षकांना स्काऊट गाईडचाच पेहराव असेल, असे नमूद करण्यात आले आहे. शाळांमध्ये कार्यरत शिक्षकांच्या नावामागे इंग्रजीत 'टीआर' आणि मराठीत 'टि' संबोधन लावण्यात यावे, या संदर्भातील बोधचिन्ह शिक्षण आयुक्त यांनी निश्चित करावे, हे संबोधन आणि बोधचिन्हे शिक्षकांना त्यांच्या वाहनावर लावता येईल, असेही स्पष्ट करण्यात आले.शिक्षकांनी गडद रंगाचे, चित्रविचित्र नक्षीकाम आणि चित्रे असलेले कपडे परिधान करू नयेत. तसेच शिक्षकांनी शाळेत जीन्स, टीशर्ट परिधान करू नये.